दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-३१ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ६ मार्च २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा शहराचा श्वास गुदमरतोय!

दिवा न्यूज विशेष /एस.के.





## डम्पिंग ग्राऊंड बंद झाले मात्र, डम्पिंगचा धूर आणि धुळीमुळे नागरिक हैराण!

## लहान मुलं व वृद्ध नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

**दिवा :-** दिवा शहरातील ठाणे महानगरपालिकेचे डम्पिंग ग्राउंड ३१ जानेवारीला मोठा गाजावाजा करत बंद झालं खरं, मात्र या डंपिंगच्या धुर आणि धुळीमुळे आजही दिवा शहरातील नागरिकांचा श्वास गुदमरत आहे.

दिवा शहरात धुराचे आणि धुळीचे प्रमाण मागील १५ ते २० दिवसापासून प्रचंड आहे.हवेची गुणवत्ता घसरली आहे. धूर आणि धुळीमुळे दिवा शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दिवा शहरातील वाढत्या धुळ आणि धुराच्या प्रमाणामुळे सर्दी,ताप, खोकल्याचे आजार वाढले असून अशा प्रकारचे वातावरण दमा व लहान मुलांमध्ये खोकल्याचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत ठरते असे येथील डॉक्टर सांगतात. डम्पिंग ग्राउंड बंद केल्यानंतर शास्त्रोक्त पद्धतीने येथील डम्पिंग मधून निघणारा धूर व धूळ यावर प्रक्रिया होणे अपेक्षित होते. ठाणे महानगरपालिका प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना केल्या नसल्याने दिवा शहरात धुराचे व धुळीचे साम्राज्य असल्याचा आरोप आता दिव्यातील जाणकार नागरिक करत आहेत. एकीकडे डम्पिंग ग्राउंड बंद झाल्याचा आनंद दिवावासीयांना असतानाच दुसरीकडे बंद झालेल्या डंपिंग ग्राउंड मधून सतत निघणारा धूर आणि धूळ यामुळे आरोग्य धोक्यात येत असल्याच्या तक्रारी दिवा शहरातील स्थानिक नागरिक करत आहेत. सायंकाळच्या वेळेला दिवा शहरातील धुराचे आणि धुळीचे प्रमाण स्पष्टपणे जाणवते.रस्त्याने चालत जाणारे नागरिक पालिकेच्या निष्काळजीपणाची चर्चा करतात. नागरिकांना अक्षरशः नाकावर रुमाल घेऊन चालावे लागते. मास्क लावण्याशिवाय लहान मुलं वृद्धांना पर्याय राहत नाही. वाढलेल्या धूर आणि धूळ प्रदूषणामुळे मोकळा श्वास दिव्यातील नागरिक घेऊ शकत नाहीत. शहरातील अनेक इमारतींच्या घरांमध्ये धूळ साचलेली पाहायला मिळते.राहत्या घरात दररोज येणारी धूळ अनेकांसाठी चिंतेचा विषय आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात नागरिकांना समस्या भेडसावत असताना दिवा प्रभाग समिती मधील स्थानिक अधिकारी करतात काय? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित राहतो.डम्पिंग ग्राउंड वर लागणारी आग विजवण्याचं काम वेळेत होत नाही. परिणामी दिवा शहरातील नागरिकांना धुराच्या समस्येला सामोरे जावे लागते. ठाणे महानगरपालिकेच्या घन कचरा विभागाने ही समस्या गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. पालिका आयुक्तांनी



याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. केवळ डम्पिंग ग्राउंड बंद केले म्हणजे दिव्यातील प्रदूषणाचा प्रश्न सुटला अशातला भाग नाही.तर बंद केलेले डंपिंग ग्राउंड शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्याची गरज आहे हे ठाणे महानगरपालिका प्रशासनाने लक्षात घ्यायला हवे.डम्पिंग ग्राउंड वरून निघणारा धूर व धुळामुळे दिवा शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.शहरातील डॉक्टरांकडे रुग्णांची वाढलेली संख्या हे त्याचे बोलके उदाहरण आहे. महापालिकेने याचे सर्वेक्षण केल्यास धूळ आणि धुरामुळे दिव्यात आजारी पडणारी लहान मुलं व नागरिक याचा अंदाज महापालिका प्रशासनाला येईल. प्रशासनाने नागरिकांचे आरोग्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करायला हव्यात अशी मागणी नागरिक करत आहेत.

# वृक्षप्रेमींच्या सतर्कतेने होळीत दहन होणारा आंबा बचावला

**ठाणे :** 'झाडे लावा, झाडे वाचवा' असा संदेश प्रत्येक स्थानिक प्रशासन विभागाकडून दिला जातो. मात्र, होळीत दहनासाठी आंब्याच्या झाडावर कुऱ्हाड चालवत तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र दक्ष नागरिक आणि वृक्षप्रेमींच्या ही बाब वेळीच लक्षात आल्याने ते वृक्ष आता बचावले आहे. ज्या ठिकाणी कुऱ्हाडीचे घाव घातले गेले तेथे मातीचा लेप लावून त्याच्यावर गोणपाट गुंडाळल्याने त्या झाडाला जणू नवसंजीवनी मिळाली आहे. हा प्रकार ठाणे कोपरी पूर्व येथील अष्टविनायक चौकात घडला आहे.

होळी आता दोन दिवसांवर आली असल्याने होळीसाठी लाकडांची शोधाशोध सुरू झाली आहे. सुकलेल्या झाडांचे ओंडके अथवा गवत मिळवण्यासाठी ठिकठिकाणी अनेकजण जाताना दिसतात. या दिवसात जीवंत झाडं तोडू नका असे वारंवार सांगितले जाते. झाड अथवा फांदी तोडणाऱ्या फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र सूचनांकडे अनेकजण दुर्लक्ष करताना दिसत आहेत. ठाणे पूर्वेतील अष्टविनायक चौकात सात वर्षे जुने असलेले आंब्याचे झाड तोडण्याचा प्रयत्न झाला. परंतु जागरूक नागरिकांनी आंब्याच्या झाड थोडक्यात बचावले आहे.

स्वराज सामाजिक संस्थेमाध्यमातून लहानसे रोपटे लावले होते. ते झाड आता सात वर्षांचे झाले असून अचानक शुक्रवारी कोणी अनोळखी इसमांनी त्याच्या धारधार शस्त्र चालवून तोडण्याचा प्रयत्न केला. तोडताना झाडाच्या खोडावरच घाव घातले. झाड तोडल्याचे लक्षात येऊ नये यासाठी त्याच्यावर हळूहळू घाव घातले होते. परंतु वेळीच नागरिकांच्या ती बाब लक्षात आल्याने ते बचावले आहे. घाव घातले गेले तेथे मातीचा लेप लावत गोणपाट गुंडाळून त्याला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला आहे. अशी माहिती वृक्षप्रेमी मनोहर चव्हाण यांनी दिली.



# प्लास्टिक विरोधी कारवाई करणाऱ्या ठाणे मनपा पथकावर हल्ला

**ठाणे :** ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील वर्तकनगर प्रभाग समितीमध्ये समता नगर येथे शनिवारी (४ मार्च) सिंगल यूज प्लॅस्टिक पिशवी प्रतिबंध मोहिम कारवाई करण्यास गेलेल्या ठाणे महापालिकेच्या पथकावर दुकानदाराने हल्ला केला असून याप्रकरणी बाळाराम देवासी याला वर्तकनगर पोलिसांनी अटक केली आहे. या भ्याड हल्ल्याचा महापालिकेने तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

शनिवारी दुपारी उपमुख्य स्वच्छता निरीक्षक हेमंत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली दीपेश मंत्री आणि समीर डोळे हे स्वच्छता निरीक्षक आणि उस्मान खान हा सफाई कामगार यांचे पथक समता नगर भागातील रस्त्यावर पडलेला कचरा, कचरा फेकणारे नागरिक आणि बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांची तपासणी करत असताना भैरी भवानी सुपर मार्केट या दुकानात प्लास्टिक पिशव्या, प्लस्टिक चमचे आणि इतर बंदी असलेले प्लास्टिक साहित्य या पथकाच्या निदर्शनास आले. त्यांनी दुकानदाराला पाच हजार रुपयांचा दंड करणारी पावती तयार केली. बाळाराम देवाशी यांनी मात्र विरोध करून अधिकाऱ्यांना दमदाटी केली. अधिकाऱ्यांनी रस्त्यावर ठेवलेले दुकानातील साहित्य जप्त करण्यासाठी अतिक्रमण विरोधी पथकाला बोलावले असता, बाळाराम देवासी यांनी अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून कुंडी फेकून मारण्याचा प्रयत्न केला.

या हल्ल्यात उपमुख्य स्वच्छता निरीक्षक हेमंत चौधरी यांच्या डोळ्याला दुखापत झाली आहे. याबाबत वर्तकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इंटरनेट सर्व्हर बॉक्स व केबलला आग

**ठाणे:** लुईसवाडी, येथील तळ अधिक १० मजली असलेल्या मैत्री हाईट्स या इमारतीच्या टेरेसवरील इंटरनेट सर्व्हर बॉक्स व इंटरनेट केबलला आग लागल्याची घटना रविवारी सकाळी साडेआठ ते पावणे नऊच्या दरम्यान घडली. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसून घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, त्या आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविले अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## वॉशिंग मशीनला आग

**ठाणे:** महागिरी कोळीवाडा, येथे कृष्णा अमृत सोसायटीच्या २ ऱ्या मजल्यावरील रूम नं. २०२ मध्ये वॉशिंग मशीनला आग लागल्याची घटना रविवारी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या आगीत कोणालाही दुखापत झाली नसली तरी मशीनचे नुकसान झाले आहे. ही आग तब्बल पाऊणतासांनी नियंत्रण आली.या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली होती. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## महिला दिनानिमित्त खुली पाककला स्पर्धा

**ठाणे :** आगामी आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि स्वराज सामाजिक सेवा संस्थेच्या महिला मंडळातर्फे शुक्रवार १० मार्च रोजी ठाणे महापालिका क्षेत्रमर्यदित खुल्या पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील स्पर्धकांना बटाट्यापासून बनवलेले पदार्थ सादर करायचे आहेत. अष्टविनायक चौकातील मैदानात सायंकाळी ६.०० वाजता होणाऱ्या स्पर्धेच्या प्रवेशिका ८ मार्चपर्यंत स्विकारल्या जातील. अधिक माहितीसाठी स्वराज सामाजिक सेवा संस्थेच्या महिला अध्यक्षा सविता मनोहर चव्हाण यांच्याशी ८३५५८२५२७२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# आरटीई प्रवेश जुनिअर आणि सिनिअर केजी मधे द्या- काँग्रेसची मागणी

**ठाणे:** आरटीई कायद्यांतर्गत २५% राखीव जागांवरील शाळा प्रवेशा संदर्भात थेट पहिलीत प्रवेश न देता तो जुनिअर आणि सिनिअर केजी या वर्गात देण्यात यावा अशी मागणी ठाणे काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते व सरचिटणीस सचिन शिंदे आणि समता विचार प्रसारक संस्था यांनी केली आहे या मागणीचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री व शिक्षण विभागाला दिले.

बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार २००९ (RTE) अंतर्गत प्रवेशासाठी वय मर्यादा, प्रवेशाचा वर्ग प्ले ग्रुप/ नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनियर केजी, इयत्ता १ ली यांमधील सामाजिक मागास व आर्थिक मागास असलेल्या प्रवर्गासाठी इयत्ता ८ वी पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे अशी शासनाची योजना आहे.

या योजनेअंतर्गत रजिस्टर झालेल्या सर्व शाळांमध्ये प्ले ग्रुप /नर्सरी पासून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे परंतु असे होत नाही.बहुतांश शाळांमध्ये इयत्ता १ली पासूनच प्रवेश साठी अर्ज करता येतो आहे. पालकांना आपल्या मुलांसाठी प्ले ग्रुप/नर्सरी जुनियर केजी, सिनियर केजी साठी अर्ज करायला मिळत नाही आणि डमिशन होत नाही.त्याचा परिणाम प्लेग्रुप नर्सरीची फी सुद्धा ६० ते ७० हजार रुपये भरावी लागते. जर अशा वेळेत या योजनेचा लाभ प्ले ग्रुप / नर्सरी, ज्युनियर केजी,सीनियर केजी साठी पालकांना आणि विद्यार्थ्यांना मिळत नसल्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान देखील होत आहे. मोठ्या प्रमाणात शाळा रजिस्टर केलेल्या आहेत.परंतु एकाही शाळेमध्ये प्लेग्रुप नर्सरी,ज्युनिअर केजी,सिनियर केजी साठी जागा दाखवत नाहीये. त्यामुळे राज्य सरकारने या विषयात जातीने लक्ष घालून लवकरात लवकर व आरटीआय प्रवेश सुरु होण्यापूर्वी कारवाई करावी आणि प्लेग्रुप,जुनिअर आणि सिनिअर केजीतच प्रवर्ष देण्यात यावा अशी मागणी ठाणे काँग्रेस मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे व समता विचार प्रसारक संस्थेने केली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# श्लोक नगरच्या रस्त्याची रमाकांत मढवी यांच्याकडून पाहणी

दिवा:– श्लोक नगर येथे सुरु असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी शिवसेना शहरप्रमुख व माजी उप महापौर रमाकांत मढवी यांनी केली.काम चांगल्या दर्जाचे करण्याच्या सूचना यावेळी मढवी यांनी संबंधितांना दिल्या. यावेळी विभाग प्रमुख – चरण दास म्हात्रे, विनोद मढवी उप विभाग प्रमुख मनोज गुप्ता, उप शाखा प्रमुख अमृत लाल गुप्ता, अभिषेक ( सोनू ) पाण्डेय व शिवसेनेचे स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते...







डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ दिवा शहरचे प्रमुख संघटक तसेच दिवा शहरातील सामाजिक, धार्मिक,राजकीय सलोखा जपणारे व सर्व समाजबांधवांशी एकसंघ राहणारे व कायम सर्वांना मदत करणारे बालाजी गंगाराम कदम यांना विदर्भातील कारखेड फाटा ता.उमरखेड जि. येवतमाळ या ठिकाणी २६ फेब्रुवारी २०२३ रोजी सम्राट अशोका सहावी बौद्ध धम्म परिषदे मध्ये समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बालाजी कदम हे नांदेड जिल्ह्यातील उमरी या छोट्याशा खेडेगावातून मुंबईला दिवा या ठिकाणी आल्यावर स्वतःच्या व्यवसायात प्रगती करून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेने समाजातील गरजूना तसेच अन्य समाजातील माणसांना देखील नेहमी मदत करायला तयार असतात.बालाजी कदम हे शहरात जरी व्यवसायाच्या निमित्ताने राहत असले तरी आवर्जून आपल्या मायभूमितील बांधवाना देखील सर्वतोपरी नेहमी मदत करायला नेहमीच तयार असतात अशी भावना त्यांच्या मित्र परिवाराने व्यक्त केली आहे.

# दिवा शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवगर्जना अभियान



**दिवा:**–शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने दिवा शहरात शिवगर्जना अभियान अंतर्गत दिवा शहरातील जनसंपर्क कार्यालय भेटी देण्यासाठी कल्याण लोकसभा संपर्क प्रमुख माजी आमदार सुभाष भोईर आणि जिल्हाप्रमुख सदानंद थरवल यांनी साबे जनसंपर्क कार्यालय आणि दातीवाली जनसंपर्क कार्यालय येथे भेट देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.यावेळी उपशहर प्रमुख सचिन राम पाटील, ज्येष्ठ शिवसैनिक राम पाटील, माजी नगरसेविका सौ अंकिता विजय पाटील, उपशहर संघटक प्रियांका सावंत, योगिता नाईक, विभागप्रमुख राजेश भोईर, चेतन पाटील, मच्छिंद्र लाड , युवा सेनेचे अभिषेक ठाकूर , महिला विभाग संघटक स्मिता जाधव, वंचित बहुजन आघडी चे मिलिंद गवई दिवा शहरातील सर्व शाखा प्रमुख , युवा सेना ,महिला आघाडी पदाधिकारी उपस्थित होते.

# हर्षल, श्रुष्टी, दिव्या मुंबई विद्यापीठाच्या संघात

**ठाणे –** आगामी पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धे साठी मुंबई विद्यापीठाच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे . भुवनेश्वर येथे केएचटी विद्यापीठ आयोजित , १० ते १८ मार्च दरम्यान रंगणाऱ्या या स्पर्धकरता ठाण्यातील तिघींची मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड झाली.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या हर्षल जाधव ,दिव्या परब आणि आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत झुनझुनवाला महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणारी श्रुष्टि नाईक या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील या तिघी ठाण्यातील वसंत विहार क्लब हाऊसच्या खेळपट्टीवर रायझिंग प्लेयर्स क्रिकेट क्लबमध्ये आशिष मोरणकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेटचा सर्व करतात.हर्षलने विभागीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत एकूण १३६ धावांसह स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाजाचे पारितोषिक पटकावले होते. तर श्रुष्टी नाईकने आंतर महाविद्यालयीन स्पर्धे त १२३ धाव आपल्या खात्यात जमा



केल्या होत्या. याशिवाय श्रुष्टीने मुंबई क्रिकेट संघटनेच्या अर्जुन मढवी स्मृती महिला क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात ५१ धावांची झंझावाती अर्धशतकी खेळी करत आपली दाखल घ्यायला लावली होती. दिव्या प्रबची संघात यष्टीरक्षक म्हणून इंवड करण्यात आली आहे. दिव्याने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत चार यष्टिचित आणि यष्टीपाठी सहा झेल पकडून संघातील आपले स्थान निश्चित केले. संघ : सौम्य सिंग (युपीजीडी), हर्षल जाधव (जोशी बेडेकर महाविद्यालय), श्रुष्टी नाईक (झुनझुनवाला महाविद्यालय), श्वेता कलपथी (एन.एल. दालमिया महाविद्यालय),रिद्धी सिंग, कोमल जाधव (दोन्ही झुनझुनवाला महाविद्यालय), जया नेगी, दिशा चांडक ,रिया साळुंके, पुर्वा केंडे, हर्षित सैनी (सर्व खालसा महाविद्यालय), दिव्या परब (जोशी बेडेकर महाविद्यालय), उल्का पाटील (व्हिवा महाविद्यालय).

# महाराष्ट्रामध्ये श्वान दत्तक योजना लागू!

**ठाणे :** राज्यामध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव व त्यासाठी करावी लागणारी उपाय योजना या विषयावर आमदार प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी सुचना मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. त्यावर त्वरीत उपाय योजना करून राज्यातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा यांनी प्रत्येक जिल्ह्यामध्ये व शहरी भागामध्ये श्वान दत्तक योजना ताबडतोब चालू करावी, असे पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. अशी माहिती आमदार सरनाईक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

या योजनेमध्ये शहरातील सर्व श्वान स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रीत करून त्यांचे निबिर्जीकरण (नसबंदी) करावी तसेच आजारी श्वानांवर स्थानिक स्वराज्य संस्थेने उपचार करावेत. शहरातील प्राणिमित्र संघटना व प्राणिमित्रांना आवाहन करून जे श्वान चांगल्या स्थितीत आहेत त्या श्वानांची दत्तक योजना चालू करावी. जर एखादा प्राणीमित्र श्वान दत्तक घ्यायला तयार असेल परंतु, त्याची आर्थिक परिस्थिती नसेल अश्या श्वानांच्या वार्षिक आरोग्याचा खर्च हा स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा व खाण्यापिण्याचा खर्च हा प्राणीमित्रांनी करावा, अश्या प्रकारच्या सुचना आमदार सरनाईक यांनी पशुसंवर्धन मंत्री विखे पाटील यांना केल्या. त्यावर पशुसंवर्धन मंत्र्यांनी या सर्व सुचनांचा अंतर्भाव करून राज्यामध्ये सर्वत्र श्वान दत्तक योजना चालू करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे श्वान दत्तक योजना चालू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरणार आहे, असे आमदार सरनाईक यांनी सांगितले.यामुळे श्वानप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून भटक्या कुत्र्यांपासून त्रास होणार्या अनेक ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांनी सुटकेचा श्वास सोडलेला आहे. श्वान दत्तक योजनेबाबत मी मांडलेल्या सर्व सुचनांचा विचार केल्याबद्दल सरकारचे व पशुसंवर्धन मंत्री विखे पाटील यांचे आमदार सरनाईक यांनी आभार मानले.



# रस्त्याच्या दुतर्फा आढळणाऱ्या भंगार गाड्या हटविण्याची कारवाई सुरूच ठेवावी –आयुक्त अभिजीत बांगर

**ठाणे : शहरात अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भंगार गाड्या उचलण्याची कारवाई शहरात सुरू असून मंगळवारी नुकतीच इटर्निटी मॉल ते ज्ञानसाधना महाविद्यालय येथील सर्व्हिस रोडवरील तीन चाकी व चार चाकी बंद व भंगार अवस्थेतील गाड्या वाहने हटविण्याची कारवाई करण्यात आली. सदरची भंगार वाहने ही बाटा कंपाऊंड येथे जमा करण्यात आली आहेत. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला असून येथील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे.**

## इटर्निटी ते ज्ञानसाधना महाविद्यालय येथील सर्व्हिस रोडवरील भंगार गाड्यांवर महापालिकेची कारवाई

शहरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या जागा मोकळ्या असणे गरजेचे आहे. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भंगार अवस्थेतील गाड्यांचा त्रास नागरिकांना व वाहतूकीस होवून परिसरात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा भंगार अवस्थेतील गाड्या नजरेस पडल्या तर त्या तात्काळ हटविण्याचे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी सर्व विभागाच्या उपायुक्त व सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत.

आयुक्त अभिजीत बांगर यांच्या आदेशानुसार परिमंडळ २ चे उपायुक्त शंकर पाटोळे यांच्या उपस्थितीत सहाय्यक आयुक्त व स्थानिक पोलीसांच्या मदतीने सदरच्या भंगार गाड्या उचलण्याची कारवाई करण्यात आली. यात चार चाकी गाड्या, दुचाकी, तसेच भंगार अवस्थेतील शववाहिका उचलण्यात आली. तसेच या ठिकाणी उभ्या करण्यात आलेल्या खाजगी बसेस, हातगाड्या देखील हटविण्यात आल्या असल्याचे उपायुक्त शंकर पाटोळे यांनी नमूद केले.

संपूर्ण शहरात वेळोवेळी ही कारवाई सुरू रहावी याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी तिन्ही परिमंडळ उपायुक्तांना दिले आहेत. तसेच नागरिकांनीही याबाबत काही तक्रारी असतील तर आपत्कालीन विभागाशी ८६५७८८७१०१ / ८६५७८८७१०२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.





# जिल्हा रुग्णालयात साजरा होणार कर्णबधीरता सप्ताह

**ठाणे :** जागतिक कर्ण बधिरता दिन आज ३ मार्च रोजी साजरा होत असताना ठाण्यात जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने १ ते ८ मार्च या कालावधीत जागतिक कर्णबधीरता दिन व सप्ताह साजरा केला जाणार असल्याची माहिती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक कैलास पवार यांनी दिली.

बुधवारी जिल्हयातील तालुका आरोग्य अधिकारी व वैदयकीय अधिक्षक यांची कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात जिल्ह्यातील कान, नाक, घसा तज्ञ डॉ. माधवी पंदारे यांनी कानाची काळजी कशी घ्यावी याविषयीचे मार्गदर्शन केले. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत हेअररींग स्क्रीनींग् कसे करू शकतो, याबाबत माहिती दिली. या सप्ताहामध्ये विविध शाळा, अंगणवाड्या येथील मुलांची तपासणी करण्यात येणार असून, त्यांना कर्णबधिरतेचे धोके, लक्षणे, उद्धवणाऱ्या विविध समस्या व त्यावरील उपाययोजना आदी बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच, गावपातळीवरील कार्यरत आशा वर्कर, एएनएम व इतर हेल्थ वर्कर यांचा कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. सर्व शाळांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. परिचारिका प्रशिक्षण केंद्र यांच्यामार्फत प्रभातफेरी आयोजित केली जाणार आहे. तसेच जिल्हा रु ग्णालयातील कान, नाक, घसा विभागामार्फत शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. यात नवजात बालकांचे कर्णबधिरता तपासणीसाठी ओईए तपासणी केली जाणार आहे. शिबिरात आढळलेल्या रुग्णांना बेरा तपासणी व क्लॉलीअर इनप्लान्ट करीता जवळच्या रुग्णालयांना सांगितले जाणार आहे. ज्येष्ठ नागरीक व इतर रु ग्णांची ऑडियोमेट्री तपासणी करून पात्र लाभार्थ्यांना ऐकण्याचे यंत्र देण्यात येणार आहे. या कालावधीत पात्र रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येणार आहे.




जाणता राजा मित्र मंडळच्या नुकतेच आधार कार्ड, मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या आरोग्य शिबिराला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. (छाया– सुदेश सकपाळ)




भारतीय जनता पार्टीच्या वतीने शनिवारी ओम साई अपार्टमेंट, एन.आर. नगर, क्रिश कॉलनी रोड दिवा पश्चिम येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजन करण्यात आले. यावेळी विजय अनंत भोईर, अशोक पाटील, विनोद भगत, गणेश पद्माकर भगत, सचिन रमेश भोईर, सतीश केळशीकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# दिव्यातील तरुण- तरुणींचे प्रश्न जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचे ध्येय घेऊन वाटचाल करणाऱ्या साक्षी रमाकांत मढवी

जागतिक महिला दिन विशेष
८ मार्च



शहरातील शिवसेना पक्षाच्या युवती सेना शहर अधिकारी कुमारी साक्षी रमाकांत मढवी या मागील काही वर्षापासून आपल्या परीने तरुणांना संघटित करून सामाजिक कार्य करत आहेत. वडील रमाकांत मढवी हे माजी उपमहापौर असले तरी समाजकार्याचा वारसा त्यांच्याकडून घेताना साक्षी मढवी या स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. आपल्या पद्धतीने समाजातील तरुणांना भेडसावणाऱ्या समस्यांचा पाठपुरावा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न साक्षी मडवी करताना दिसतात. राजकारणा पलीकडे जाऊन समाज हिताचे अनेक उपक्रम त्यांनी राबवले आहेत.कोरोना काळापासून आतापर्यंत विविध लोकोपयोगी उपक्रम राबवताना वेगवेगळ्या समस्या घेऊन रमाकांत मढवी यांना भेटायला येणाऱ्या नागरिकांच्या समस्या साक्षी मढवी या स्वतः जाणून घेत असतात.

दिवा शहरातील तरुणांना व तरुणींना उपयोगाचे उपक्रम राबवताना विशेषतः तरुणीसाठी सुरक्षा विषयक उपक्रम साक्षी मढवी या राबवत असतात. शहरातील तरुणींना संघटित करून दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात शुभेच्छा देऊन त्यांना धीर देण्याचे काम साक्षी मढवी दरवर्षी आवर्जून करताना दिसतात. याचबरोबर आरोग्य शिबिर, जनजागृती शिबिर व पक्षात युवती नोंदणी कार्यक्रम साक्षी मढवी घेत असतात. कमी वयामध्ये समाजकार्याचे भान ठेवून वाटचाल करणाऱ्या साक्षी मढवी या दिव्यातील एकमेव तरुणी आहेत. संघटन कौशल्य, वक्तृत्व यामुळे त्या सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत. पक्षाची ध्येय धोरण, पक्षाचे उपक्रम यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतोच,मात्र त्याचबरोबर त्यांचा सर्वाधिक भर हा दिवा शहरातील तरुणींना सोबत घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेण्याकडे त्यांचा कल अधिक असतो. महिला दिनानिमित्त अशा तरुण सामाजिक कार्यकर्त्यांना समाजातील जाणकार व नागरिकांनी पाठबळ देण्याचा निर्धार करायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त करायला हरकत नाही.













## कोकण ग्रामीण वार्ता

प्रतिनिधी / एम. एम. काझी



दिवा पश्चिम येथील एन आर नगर रस्त्याचे कॉंक्रिटीकरणचे काम करण्यात आले. यावेळी कामाची पाहणी करताना माजी नगरसेवक अमर पाटील व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# ठाणे पनवेल लोकल ट्रेन सुरू करा, शिवाजी आव्हाड यांची रेल्वे मंत्र्यांकडे मागणी



**डोंबिवली:–** कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रामध्ये आगासन काटइ मानपाडा निळजे देसाई पडले गाव, खोणी गाव या भागामध्ये प्रचंड प्रमाणात नागरी वसाहत निर्माण झाली आहे.लाखो लोकाचे दररोज नोकरीनिमित्त ठाणे मुंबई नवी मुंबई तळोजा एमआयडीसी येथे दररोज ये जा करावी लागत असते त्यांना जाण्यास साठी बसेसचा उपयोग करावा लागतो किंवा खाजगी वाहनाचा वापर करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन येथील नागरिकांच्या सुविधासाठी ठाणे पनवेल लोकल रेल्वे सेवा सुरू करावी अशी मागणी भाजपचे शिवाजी आव्हाड यांनी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे.

याभागतील सर्व नागरिकांना दिवा स्टेशन किंवा डोंबिवली स्टेशन येथे जाण्यास लांब पडते व गैरसोय होते. जर सकाळी व संध्याकाळी दहा लोकल ट्रेन सीबीडी बेलापूर ठाणे, दिवा ते तळोजा – पनवेल अथवा ठाणे ते दिवा मार्गे तळोजा एमआयडीसी पनवेल अशी रेल्वे लोकल सुरू केली तर लाखो लोकांना याचा फायदा होईल. आपण संबंधित आपल्या रेल्वे अधिकाऱ्यांना त्वरित या संबंधित सर्वे करून नवीन लोकल ट्रेन सुरू करण्याचे निर्देश रेल्वे अधिकाऱ्यांना द्यावेत अशी मागणी शिवाजी आव्हाड यांनी केली.

# वन बीएचके रेस्टॉरंट आता नवी मुंबईकरांच्या सेवेत नवी मुंबईतील खवय्यासाठी वन बीएचके ठरणार पर्वणी

**नवी मुंबई :** गोवन – पोर्तुगल या संकल्पनेवर आधारित असणारे वन बीएचके हे रेस्टॉरंट ९ मार्च २०२३ पासून अधिकृतपणे सेवा देणार आहे . यशस्वी आदरतिथ्य देणाऱ्या रेस्टॉरंटची यशस्वी शृंखला अशी ओळख असणाऱ्या वन बीएचके आता नवी मुंबई सुरू होत आहे .मुंबई व बेंगलोर मध्ये आपली ओळख निर्माण करणारे रेस्टॉरंट वाशीत सुद्धा असणार आहे.

एफ अँड बी मध्ये निपुण असणारे अंकित आनंद (सहसंस्थापक) , अदिती शिरवाईकर मलिक (सहसंस्थापिका), अभिनय क्षेत्रातची पार्श्वभूमी असणारी सिंपल कौल (सहसंस्थापिका) आणि माध्यम क्षेत्रात ठसा उमटविणारी वत्सला राजीव राज (सहसंस्थापिका), सुप्रसिद्ध उद्योजक सुरज शेट्टी (भागीदार) या चार मित्रांना वन बीएचके ची संकल्पना एका प्रवासादरम्यान सुचली. ज्यामध्ये सर्वच वयोगटातील लोकांना एकत्रित जमता येईल. शहराच्या कल्लोळापासून दूर असे एक ठिकाण जिथे तुम्हाला पोर्तुगाल गोवन, उत्तर भारतीय व इटालियन पाककृतीची स्वाद चाखता येईल.

वन बिएचके चे हे मेनू प्रतिभावंत आणि अनुभवी शेफने तयार केले आहे.




मेनू प्रादेशिक तसेच महाद्वीपीय पाककृती दाखवतो. बुद्ध बाऊल, केरळ शैलीतील मिरपूड घालून चिकन, बटर चिकन, बनी चाओ, प्रॉन करी, क्रीमी पास्ता आणि बरेच काही आवडते पदार्थ या ठिकाणी अनुभवास मिळतील.

ईटोपिया यांनी वन बीएचके रेस्टॉरंट नवी मुंबईत असावे याकरिता जुळले आहेत. या संस्थेचे संस्थापक रामकृष्णन यांनासुद्धा नवी मुंबईमध्ये अशी उत्तम प्रतीचे रेस्टॉरंट असावे ही इच्छा होती. त्यांची ही इच्छा आता सत्यात उतरली आहे.त्याच्या नावावरून सूचित केल्याप्रमाणे – यूटोपिया, एक आदर्श विश्व या साहित्यिक संकल्पनेचा आढावा – इटोपिया ही एक नवी ओळख आहे. फॉरमॅट्स आणि फ्रँचायझींच्या सर्वसमावेशक स्पेक्ट्रममध्ये कार्यरत – स्पेशॅलिटी डायनिंग, क्यू एस आर आणि इंटरनेट ब्रँड्स – नेटवर्कमध्ये सध्या आग्नेय आशिया, भारत आणि मध्य पूर्व मध्ये ३५,००० पेक्षा जास्त ग्राहकांना सेवा देणारी ३० हून अधिक रेस्टॉरंट्स आहेत.

संगीतकार शंकर महादेवन, एहसान ,गायक हरिहरन सुप्रसिद्ध गायक शान, सुरज शेट्टी, शिप्रा शेट्टी,राम, अंकित आनंद, मोहित मलिक, अभिनेत्री सिम्पल कौल आदी कलावंतांनी भेट देऊन या रेस्टॉरंटचे कौतुक केले.



**दिवा गावतील सुपुत्र कु.सौरभ शंकर भोईर हे डी वाय पाटील युनिव्हर्सिटी, नवीमुंबई येथुन बीएएमएस ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी घेत डॉक्टर झाले आहेत. गावातील ग्रामस्थांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.आयुसचे अध्यक्ष गोविंद भगत यांनी सौरभ यांस शुभेच्छा दिल्या आहेत.**

जागतिक महिला दिन विशेष
८ मार्च



## जिद्द व चिकाटीच्या जोरावर वृत्तपत्र विक्रेता म्हणून व्यवसाय वाढवणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्या मनीषा कदम

मनीषा कदम यांचा दिवा पूर्वेकडे वारेकर शाळेसमोर न्यूज पेपर स्टॉल आहे.कदम न्यूज पेपर एजन्सीच्या नावाने गेली पंधरा वर्षे वृत्तपत्र विक्रेता म्हणून मनीषा कदम व त्यांचे पती काम पाहत आहेत. मनीषा कदम या स्वत: सकाळी ठाणे स्टेशन येथे जाऊन वृत्तपत्र घेऊन येत असतात. वृत्तपत्र हा व्यवसाय असा आहे, ज्यामध्ये वेळेला महत्त्व आहे. पहाटे सहा च्या आधी मनीषा कदम व त्यांचे पती वाचकांसाठी वृत्तपत्र स्टॉल सुरू करतात. महिला दिनानिमित्त मनीषा कदम यांच्या जिद्द व चिकाटीला आम्ही दिवा न्यूज मार्फत शुभेच्छा देतो!

## रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने रिक्षा चालकांनी मानले निलेश पाटील यांचे आभार



दिवा:–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निधीतून खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी उपमहापौर रमाकांत मढवी,माजी नगरसेवकांच्या आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा प्रयत्नातून साबे गाव मराठी शाळा ते स्मशान भूमि रोड या रस्त्याचे काम झाल्याबद्दल जीवदानी आई रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निलेश पाटील यांची भेट घेत त्यांना धन्यवाद दिले व आभार व्यक्त केले. निलेश पाटील यांनी या रस्त्यासाठी वारंवार पाठपुरावा केला होता. हा रस्ता पूर्णत्वास गेल्याने रिक्षाचालकांनी निलेश पाटील यांना धन्यवाद दिले आहेत.




## नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडणाऱ्या अर्चना निलेश पाटील






दिवा:–मागील काही वर्षापासून अर्चना निलेश पाटील या सामाजिक कार्यात सक्रिय असून राजकारणात ही त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.रोखठोक स्वभाव असणाऱ्या अर्चना पाटील या स्थानिक नागरिकांच्या समस्यांवर नेहमी आक्रमकपणे आपला आवाज उठवत असतात. त्यांनी आजपर्यंत आपल्या भागातील अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली असून नागरिकांचे विविध प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी लढा दिलेला आहे. सुरुवातीला भारतीय जनता पार्टी मध्ये काम करणाऱ्या अर्चना पाटील यांना मागील निवडणुकीत नागरिकांनी भरघोस मतदान केले होते. फार कमी मतानी त्यांचा त्यावेळी पराभव झाला होता. आता अर्चना पाटील या शिवसेनेमध्ये सक्रिय असून शिवसेनेच्या माध्यमातून नागरिकांचे विविध प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. नागरिकांसाठी आरोग्य शिबिर, रोजगार मेळावे,हळदीकुंकू समारंभ, बेरोजगारांसाठी रोजगार शिबिर असे विविध कार्यक्रम अर्चना पाटील या पती निलेश पाटील यांच्या सहकार्याने राबवत असतात. साबे गावातून त्यांना मोठा प्रतिसाद लाभलेला दिसतो. अनेक समस्यांवर मात करत समाजकार्यात व राजकारणात त्यांनी निर्माण केलेली ओळख कौतुकास्पद आहे.



# दिव्यातील महिलांना न्याय देणं व येथील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणं हेच ज्योती राजकांत पाटील यांचे ध्येय!




मागील दहा वर्षापासून दिवा शहरात तनवी फाउंडेशनच्या माध्यमातून येथील महिलांच्या प्रगतीसाठी सातत्याने झटणाऱ्या समाजसेविका म्हणून ज्योती पाटील यांची ओळख आहे. दिवा शहर हे तसे अनेक वर्षापासून दुर्लक्षित. ठाणे महानगरपालिका हद्दीत असले तरीही येथे आजही अनेक समस्या आपल्याला पाहायला मिळतात.या शहरातील महिलांचे सर्वाधिक हाल पाणी समस्येमुळे होतात. सामाजिक कार्य करत असताना महिलांच्या या समस्या जाणून घेऊन ज्योती पाटील यांनी पाणी प्रश्नावर आवाज उठवत महिलांना न्याय मिळवून देण्याचं प्रामाणिक प्रयत्न केला. आजही त्या महिलांच्या विविध समस्यांवर लढताना दिसतात. एकीकडे नागरी समस्या सोडवण्याचं काम ज्योती पाटील करत असताना तनवी फाउंडेशन आणि तनवी महिला पतपेढीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे धोरण ज्योती पाटील यांनी राबवण्यास सुरुवात केलेली आहे.बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक आधार कसा मिळेल यासाठी त्या प्रयत्न करत असतात. महिलांच्या हाताला काम मिळालं पाहिजे, सर्वसामान्य कुटुंबात असणाऱ्या या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत,यासाठी ज्योती पाटील यांची असणारी तळमळ शहरातील अनेक गरजू महिलांना माहीत आहे.

दिवा शहरात महिलांबाबत असणारी ज्योती पाटील यांची जाणीव त्यांना महिलांमध्ये लोकप्रिय ठरवण्यास कारणीभूत ठरते. केंद्र सरकारच्या विविध योजना,राज्य शासनाच्या विविध योजना व ठाणे महानगरपालिकेच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिला, सर्वसामान्य नागरिक यांना थेट लाभ मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न ज्योती पाटील तनवी फाउंडेशनच्या माध्यमातून करत असतात. मागील पाच वर्ष सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करत असताना ज्योती पाटील यांनी राजकीय क्षेत्रात देखील आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून महिला नेतृत्व म्हणून दिवा शहरात त्या उदयास आल्या आहेत. महिला दिनानिमित्त ज्योती पाटील दरवर्षी दिवा शहरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करत असतात. सर्वसामान्य कुटुंबात संघर्ष करणाऱ्या महिलांना न्याय देण्याचे काम त्या महिला दिनाच्या माध्यमातून करत असतात. येणाऱ्या काळामध्ये दिव्यातील महिला या प्रगत कशा होतील यासाठी त्यांचं व्हिजन आहे. त्यासाठी त्यांचा प्रयत्न चालू आहे. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळो हीच सदिच्छा!

# आरोग्य अधिकाऱ्याचे निलंबन ही स्टंटबाजी!

## ठाण्यातील आरोग्य व्यवस्था बिघडण्यास १५ वर्षे महापालिका ताब्यात असणारे मुख्यमंत्री स्वतः जबाबदार!



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांचा घणाघात

**ठाणे:– ठाणे महापालिकेची आरोग्य व्यवस्था जर कोलमडली असेल आणि त्यामुळे कळवा रुग्णालयाच्या अधिकाऱ्याचे निलंबन होत असेल तर या बेजबाबदार पणाला व नागरिकांना आरोग्य सुविधा न मिळण्याला १५ वर्षे महापालिका एकहाती ताब्यात असणारे मुख्यमंत्री शिंदे हे जबाबदार असल्याचा घणाघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी केला आहे.**

कळवा रुग्णालयाची आरोग्य व्यवस्था सुधारा अशी वारंवार मागणी आणि आंदोलने आम्ही करून सुद्धा मुख्यमंत्री शिंदे यांनी लक्ष दिले नाही. आज ठाण्यातील जनता त्यांच्या विरोधात चालली आहे तेव्हा ते स्टंट करायला लागले आहेत. मागील पंधरा वर्षाहून अधिक काळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाणे महानगरपालिका प्रशासनावर एक हाती पकड आहे. कायम सत्तेत असतानाही ठाणे शहरातील आरोग्य व्यवस्था सुधारली जात नसेल व येथील रुग्णांना आजही मुंबई महापालिकेच्या केईएम, सायन, जे जे हॉस्पिटल व अन्य रुग्णालयांवर अवलंबून राहावं लागत असेल तर मागील १८ वर्षात मुख्यमंत्र्यांनी ठाणे महानगरपालिकेत नेमका काय कारभार केला? याचे उत्तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी द्यायला हवे.केवळ एका नवनियुक्ति दिलेल्या अधिकाऱ्याला निलंबित करून स्टंटबाजी करून चालणार नाही. तेथे ठेकेदार,महापालिकेत हस्तक्षेप करणारे माजी नगरसेवक कोणाचे आहेत ? कोणाच्या आशीर्वादाने त्यांना वर्षानुवर्ष निविदा सेटिंग करून तेथे ठेके दिले जातात? मुख्यमंत्री स्वतः ठाण्यात आठ वर्ष पालकमंत्री राहिले आहेत. त्याआधी ते सलग ३ वर्षे महापालिका सभागृह नेते होते. आमदार–पालकमंत्री म्हणून त्यांनी कामकाज पाहिले आहे. स्वतःच्या ताब्यात ठाणे महानगरपालिका असताना या महानगरपालिकेची दुरावस्था का झाली ? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी ठाणेकरांना द्यायला हवे. प्रशासक नियुक्ति असताना महापालिकेचे महापौर कार्यालय, तेथील पक्ष कार्यालय, महापौर निवास, महापालिका सुरक्षारक्षकांचा खाजगी वापर,ठामपा व शासकीय निधीत दुबार तिबार काम न करता झालेले नागरी कामामधील बिलांचे झोल,नागरिकांच्या फायली बाबत अनागोंदी, भ्रष्टाचाराला खतपाणी कोणाच्या आशीर्वादाने घातले जाते ? निविदा फक्त मोजक्याच ठेकेदार कंपनी ने भरण्या साठी कोणाचे फोन जातात ? १०० ते १५० कामांच्या एकत्रित एकच निविदा का काढली जाते ? ठाणे महापालिका कारभारातील झालेल्या भ्रष्टाचारविरोधात जवळ पास १०४ जनहित याचिका दाखल होतात , या सगळ्या बाबींकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लक्ष का देत नाहीत? असा प्रश्न संजय घाडीगांवकर यांनी उपस्थित केला आहे. ठाणे शहराचा किंवा ठाणे जिल्ह्याचा विकास न होण्याला स्वतः मुख्यमंत्री कारणीभूत असल्याचा घणाघात संजय घाडीगावकर यांनी केला आहे. काही लोकांचे भले करण्यात मुख्यमंत्री मशगुल असून सर्वसामान्य लोकांना आजही आरोग्यसेवेसाठी मुंबई सारख्या ठिकाणी जावं लागतं. ज्या उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री नाव ठेवतात, त्याच मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये आज ठाण्यासह महाराष्ट्र राज्यातील हजारो सर्वसामान्य नागरिक उपचार घेतात. याची जाण मुख्यमंत्र्यांना असायला हवी.

ठाणे महापालिकेतील आरोग्यव्यवस्थेचा बोजवारा हा मुख्यमंत्र्यांचे नेतृत्व कमकुवत असल्याचं उदाहरण आहे. असा टोला संजय घाडीगावकर यांनी लगावला आहे.